जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUN 2025
पुढारी

# 'सेट' परीक्षेला ९ हजार विद्यार्थी हजर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सहायक प्राध्यापक पदांसाठी ४० वी राज्य पात्रता परीक्षा (सेट) रविवारी सुरळीतपणे झाली. कोल्हापुरातील २६ केंद्रांतून सुमारे ९ हजार ०२ विद्यार्थी परीक्षेला हजर होते, तर १६५६ विद्यार्थी गैरहजर होते. यावर्षी पहिल्यांदाच प्रश्नपत्रिकेत क्यूआर कोड व उत्तरपत्रिकेत बारकोड देण्यात आला होता.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मान्यतेने व महाराष्ट्र व गोवा राज्यात विविध १८ शहरांतील विद्यार्थ्यांसाठी ३९ विषयांसाठी ही परीक्षा घेण्यात आली. सकाळपासून शहरातील विविध केंद्रांवर विद्यार्थ्यांची गर्दी होती. पावसाचे वातावरण असतानाही विद्यार्थी पालकांसह केंद्रावर येत होते. जिल्ह्यातून सुमारे १० हजार ६५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यामधील ९ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा दिली. उपस्थितीचे प्रमाण ८४ टक्के आहे. शिवाजी विद्यापीठात मानव्यशास्त्र विभाग इमारत, भाषा भवन, पर्यावरणशास्त्र विभाग, तंत्रज्ञान अधिविभाग, रसायनशास्त्र अधिविभाग ही परीक्षा केंद्र होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUN 2025

# शिवाजी विद्यापीठात 'सायन्स बिहाइंड स्पोर्ट्स' या विषयावर चर्चासत्र



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे रविवारी क्रीडापटूंसाठी स्पोर्ट्स न्यूट्रिशन आणि स्पोर्ट्स सायकॉलॉजीच्या माध्यमातून स्टॅमिना, रिकव्हरी, फोकस आणि मानसिक ताकद वाढवण्यासाठी 'सायन्स बिहाइंड स्पोर्ट्स' या विषयावर विशेष एकदिवसीय चर्चासत्र यशस्वीरित्या संपन्न झाले. या चर्चासत्राला क्रीडापटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर आणि क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार, डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शनात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी खेळाडूंना स्पोर्ट्स सायन्स व क्रीडा क्षेत्रात करियर करण्याची सुवर्णसंधी विद्यापीठामार्फत उपलब्ध असल्याचे सांगितले. खेळाडूंच्या आयुष्यात विज्ञानाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.

सिद्धार्थ शिंदे यांनी खेळाडूंना देशाचे नाव उंचावण्यासाठी मेहनत करण्याचे आवाहन केले तसेच डोपिंगपासून दूर राहण्याचाही सल्ला दिला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, सोई सुविधा व बी ए स्पोर्ट्स अभ्यासक्रमाची माहिती दिली.

क्रीडा मानसोपचार तज्ज्ञ अनघा देशपांडे यांनी स्पोर्ट्स सायकोलॉजी या विषयाचे महत्त्व पटवून दिले आणि मानसिक तणावातून बाहेर कसे पडायचे आणि उत्तम कामगिरी कशी करायची याविषयी मार्गदर्शन केले.

आहार तज्ज्ञ प्रियंका जोंधळे आणि सुभाष आगाशे यांनी 'स्पोर्ट्स ॲन्ड न्यूट्रिशन' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा शिंदे यांनी केले तर सुरज खोपडे यांनी आभार मानले. चर्चासत्रास खेळाडू, पालक, प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUN 2025
तरुण भारत

# क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची संधी

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मत

**कोल्हापूर :** खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर ऑलंपिकवीर बनले पाहिजे. खेळाडूंना स्पोर्ट्स सायन्स व क्रीडा क्षेत्रात कॅरियर करण्याची संधी आहे. विज्ञानाचे खेळाडूंच्या आयुष्यात अतिशय महत्व आहे, असे मत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाच्यावतीने कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत खेळाडूंसाठी स्पोर्ट्स न्यूट्रिशन आणि स्पोर्ट्स सायकॉलॉजीच्या माध्यमातून स्टॅमिना, रिकव्हरी, फोकस आणि मानसिक ताकद वाढवण्यासाठी काय केले पाहिजे यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एम. एस. देशमुख, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर होते.

सिद्धार्थ शिंदे म्हणाले, खेळाडूंना डोपिंगपासून दूर राहावे. क्रीडा मानसोपचार तज्ज्ञ अनघा देशपांडे यांनी स्पोर्ट्स सायकोलॉजी या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये मानसिक तणावातून बाहेर कसे पडायचे आणि उत्तम कामगिरी कशी करायची याविषयी मार्गदर्शन केले. आहार तज्ज्ञ ऋषिकेश जांभळे, शुभम आगळे यांनी स्पोर्ट्स अॅन्ड न्यूट्रिशन या विषयावर मार्गदर्शन केले. खेळाडूंना प्रशिक्षणपूर्व आणि प्रशिक्षणानंतर आहार कसा घ्यावा. प्रोटिन्सचे महत्व आणि खेळाडंचा आहार कसा असावा, स्पर्धेदरम्यान काय काळजी घ्यावी यासंदर्भात माहिती दिली. सूत्रसंचालन मनिषा शिंदे व प्रा. सुचय खोपडे यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी क्रीडा अधिविभागाच्या सर्व कर्मचारी व बी. ए. स्पोर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. श्वागत क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने खेळाडूंना दिली जाणारी शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, सोई सुविधा व बी. ए. स्पोर्ट्स अभ्यासक्रमाची माहिती दिली. आभार प्रा. सुचय खोपडे यांनी मानले. यावेळी प्रशिक्षक सुभाष पवार, डॉ धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

1 6 JUN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पोर्टस् सायन्स, क्रीडा क्षेत्रात करिअरच्या सुवर्ण संधी

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; शिवाजी विद्यापीठामध्ये खेळाडूंसाठी एक दिवसीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्पोर्टस् सायन्स व क्रीडा क्षेत्रात करिअरच्या सुवर्ण संधी विद्यापीठामार्फत उपलब्ध आहेत. याचा विद्यार्थ्यांनी फायदा करून घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाच्या वतीने खेळाडूंसाठी स्पोर्टस् न्यूट्रिशन व स्पोर्टस् सायकॉलॉजीच्या माध्यमातून स्टॅमिना, रिकव्हरी, फोकस आणि मानसिक ताकद वाढवण्यासाठी 'सायन्स बिहाईंड स्पोर्टस्' या विषयावरील खास सेमिनारमध्ये ते बोलत होते. याप्रसंगी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार, डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाच्या वतीने खेळाडूंसाठी आयोजित सेमीनार उद्घाटनप्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. समवेत क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर आदी. (छाया : मिलन मकानदार)**

प्रथम सत्रामध्ये क्रीडा मानसोपचार तज्ज्ञ अनघा देशपांडे यांनी 'स्पोर्टस् सायकोलॉजी' विषयाचे महत्त्व पटवून दिले. मानसिक तणावातून बाहेर कसे पडायचे आणि उत्तम कामगिरी कशी करायची यावर उत्तम मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात आहार आणि तज्ज्ञ ऋषीकेश जांभळे, शुभम आगळे यांनी स्पोर्टस् अँड न्यूट्रिशन या विषयावर मार्गदर्शन केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. मनीषा शिंदे व प्रा. सुचय खोपडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा अधिविभाग व बी. ए. स्पोर्टस्च्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

16 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यश मिळविण्यासाठी शारीरिक क्षमता वाढवणे गरजेचे

## विद्यापीठात 'सायन्स बिहाईंड स्पोर्टस्'वर चर्चासत्र; तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन



**कोल्हापूर** विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे रविवारी आयोजित चर्चासत्रात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. शेजारी डॉ. शरद बनसोडे.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आज 'सायन्स बिहाईंड स्पोर्टस्' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. त्यात खेळाडूंसाठी स्पोर्टस् न्यूट्रिशन आणि स्पोर्टस् सायकॉलॉजीच्या माध्यमातून स्टॅमिना, रिकव्हरी, फोकस आणि मानसिक ताकद वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तर अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक सुभाष पवार, डॉ. धनंजय पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. बनसोडे यांनी स्वागत केले. त्यामध्ये त्यांनी विद्यापीठातर्फे खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, सोयीसुविधा आणि बी. ए. स्पोर्टस् अभ्यासक्रमाची माहिती दिली.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी खेळाडूंना स्पोर्टस् सायन्स व क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी विद्यापीठातर्फे उपलब्ध असल्याचे सांगितले. 'खेळाडूंच्या आयुष्यात विज्ञानाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. शिंदे यांनी खेळाडूंना डोपिंगपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

दरम्यान, उद्घाटनानंतरच्या पहिल्या सत्रात अभा देशपांडे यांनी 'स्पोर्टस् सायकोलॉजी' या विषयाचे महत्त्व पटवून दिले. मानसिक तणावातून बाहेर कसे पडायचे आणि उत्तम कामगिरी कशी करायची, याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात ऋषिकेश जांभळे, शुभम आगळे यांनी 'स्पोर्टस् ॲन्ड न्यूट्रिशन' या विषयावर मार्गदर्शन केले आणि खेळाडूंना प्रशिक्षणपूर्व आणि पाश्चात आहार कसा घ्यावा, प्रोटिन्सचे महत्त्व आणि खेळाडूंचा आहार कसा असावा, स्पर्धेदरम्यान कोणती काळजी घ्यावी यावर मार्गदर्शन केले. मनीषा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुचय खोपडे यांनी आभार मानले.